# लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्था अंतर्गत आयोजित कॉलेज सहल

## 23/12/2023 ते 25/12/2023

## कोल्हापूर तसेच कोकण दर्शन



लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्था आयोजित कॉलेज सहल कोल्हापूर तसेच कोकण दर्शन या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी पश्चिम व पूर्व महाराष्ट्र मधील विविध पर्यटन क्षेत्रांच्या पर्यटनाचा आनंद घेतला.

कणेरी मठ हे कोल्हापूरपासून १२ किलोमीटर अंतरावरचे एक गाव आहे. या गावात एक सिद्धगिरी नावाचे वस्तुसंग्रहालय आहे. शहरीकरणामध्ये लुप्त होऊ पहात असलेल्या ग्रामीण जीवनशैलीचे मूर्तिमंत नमुने येथे उभे केलेले आहेत.

सिद्धगिरी म्युझियमच्या सुरुवातीला बारा राशींची बारा शिल्पे आहेत. त्यानंतर एका गुहेसदृश भागातून आत जाताच प्राचीन भारतातील ऋषिमुनींचे कोरीव पुतळे बनवलेआहेत. ऋषींची नावे, त्यांची विद्या आणि त्यांचे योगदान याची सामान्य माणसाला ठाऊक नसलेली माहिती तेथे लिहिली आहे.

या गुहेतून बाहेर पडल्यावर दोन्ही बाजूला हिरवीगार शेते आणि त्यांत काम करणारी माणसे दिसतात.त्या माणसांवर जाताच समजते की ही माणसे नसून माणसांच्या प्रतिकृती आहेत.धान्याची पेरणी करण्यापासून ते धान्य घरात येईपर्यंतच्या सर्व प्रक्रिया या प्रतिकृतींमधून दाखवण्यात आल्या

आहेत. याच बरोबर शेतामध्ये बैल, गाय, म्हशी या जनावरांचा असणारा वावर; लगोरी, सूरपारंब्या, लंगडी यांचे प्रत्यक्ष दर्शन या प्रतिकृतींमध्ये जिवंत वाटाव्या इतक्या बारकाईने टिपल्या गेल्या आहेत.

बारा **बलुतेदार ही** समाजव्यवस्था खेड्यांमधून आज लुप्त होत चालली आहे. बलुतेदारी म्हणजे काय आणि त्यावर चालणारा उदरनिर्वाह याची ओळख करून देणारी शिल्पे येथे पहावयास मिळतात. कोष्टी, कुंभार, चांभार, न्हावी, लोहार, शिंपी, सोनार यांसह पिंगळा, वासुदेव यांचीही शिल्पेही त्या-त्या जीवनशैलीचे दर्शन घडवतात. ग्रामीण भागांत असलेल्या घरांचे विविध नमुने येथे पहावयास मिळतात. वतनदाराचा वाडा, पाटलाचा वाडा, शिंप्याचे घर यांच्या हुबेहूब त्रिमिती प्रतिमा येथे ठेवल्या आहेत. म्युझियमजवळच काडसिद्धेश्वराचा मठ आहे.




## महालक्ष्मी अंबाबाई मंदिर

महालक्ष्मी अंबाबाई मंदिर, कोल्हापूर हे करवीर निवासिनी श्री महालक्ष्मी अंबाबाईचे मंदिर आहे. हे मंदिर महाराष्ट्रात असलेल्या मंदिरांच्या साडेतीन पीठांपैकी एक आहे. देवीच्या माथ्यावर मातृलिंग आहे. वरच्या गाभाऱ्यात मातृलिंग आहे. बाहेर श्री काळभैरव आहे. काशी विश्वेश्वरचे मंदिर सहीत बारा ज्योतिर्लिंग ही आहेत. त्यामुळे हे मुळ आदिमाया सर्वस्यादया त्रिगुणात्मक स्वरूपिनी भगवती महालक्ष्मीचे मंदिर आहे. आजही कोल्हापूरकर अंबाबाईचे मंदिर असाच उल्लेख करतात.

मंदिरावर व्यवस्थित नजर टाकली तर जैन मुर्ती आढळून येतात.एकेकाळी येथे पद्मावती नावाची राणी राज्य करत होती असे सांगतात.या भागात त्या काळी ईडलिंबूच्या बागा असत.राणी निर्भयपणे राज्य करत असल्याने तिला सिंहासारखी शूर माणले जायचे .

देवीच्या मुर्तीमधे पद्मावतीचे चित्र रेखीवपणे कोरले आहे .ही मुर्ती पद्मावतीची असल्याचा काही ठिकाणी उल्लेख आढळतो.




वाडी रत्नागिरी आणि जोतिबा डोंगर

जोतिबा देऊळ हे बारा ज्योतिर्लिंगापैकी एक देऊळ आहे. ह्यालाच केदारनाथ किंवा वाडी रत्नागिरी म्हणतात. दंतपुराणात असे म्हणले आहे, की महालक्ष्मी देवीच्या युध्दामध्ये जोतिबा देवाने मदत केली. त्यांचे क्षेत्र डोंगरावरती आढळते. हे नाथ धर्मामध्ये येतात. कोल्हापूरच्या ऊत्तरेला घेरलेल्या हिरव्या घनदाट झाडीत व काळ्या दगडांच्या घेऱ्यात हे देऊळ आढळते. 1970 मध्ये नावाजिसाया यांनी सुरूवातीला देऊळाची बांधणी केली. समुद्रपातळीपासून 330 ऊंचीवर हे देऊळ आहे. आतील कोरीव काम हे प्राचीन आहे आणि त्यामध्ये चारशे मुर्ती आहेत.

## नाणीज धाम

जर तुम्हाला जीवनातील तणावातून परिपूर्ण आराम हवा असेल तर तुमच्या संपूर्ण ध्यान आणि मनाच्या विश्रांतीसाठी रत्नागिरीतील नाणीजधाम आश्रम हे सर्वोत्तम ठिकाण आहे. जगद्‌गुरू नरेंद्राचार्यजी महाराज यांचा जन्म महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील नाणीज या गावात शुक्रवार, २१ ऑक्टोबर १९६६ रोजी रात्री १०:३० वाजता झाला. बाबुराव सुर्वे आणि सुभद्रा देवी हे त्यांचे पालक होते. मकर राशीमध्ये जन्माला आल्याने, मुलाला मठवासी जीवन जगण्याची अपेक्षा होती. जन्म चिन्हावर शनिचे नियंत्रण असल्याने, मुलाला शौर्य, प्रसिद्धी आणि वक्तृत्व कौशल्ये असण्याची भविष्यवाणी केली गेली. नरेंद्रने लहानपणापासूनच आध्यात्मिक साधना करण्यात वेळ घालवला. ते पूज्य संत गजानन महाराजांचे भक्त झाले




. तो आपल्या लाडक्या दैवतात इतका तल्लीन झाला की त्याला प्रत्येक वेळी गजानन महाराजांचा विचारच नाही तर स्वप्नही पडू लागला. त्याला सांसारिक स्थितीत परत आणण्यासाठी त्याच्या पालकांनी त्याचे लग्न लावून दिले. त्यांचा विवाह १५ ऑक्टोबर १९८५ रोजी झाला. २४ ऑक्टोबर १९८८ रोजी त्यांना कानिफानाथ नावाचा मुलगा झाला. मुलाच्या जन्मानंतर नरेंद्र यांना वाटले की त्यांनी कुटुंबाप्रती असलेली कर्तव्ये पार पाडली आणि त्यांनी आपले जीवन अध्यात्मात पूर्णपणे अर्पण केले.

## गणपतीपुळे

गणपतीपुळे हे रत्नागिरी जिल्ह्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ आहे. येथील गणपतीची मूर्ती स्वयंभू आहे अशी मान्यता आहे. सह्याद्री पर्वतातील डोंगराळ भागात विराजलेली नैसर्गिक मूर्ती आणि जवळच पश्चिमेला अरबी समुद्र ह्यामुळे हे देऊळ आगळेवेगळे आहे. गणपतीची मूर्ती डोंगराच्या बाजूला असल्याने तिला प्रदक्षिणा घालण्यासाठी संपूर्ण डोंगराला प्रदक्षिणा घालणे क्रमप्राप्त असते. १ किलोमीटर लांबीचा हा प्रदक्षिणामार्ग समुद्र, वाळूचा किनारा आणि नारळ पोफळीच्या झाडांमुळे

अतिशय विलोभनीय आहे. या ठिकाणी समुद्र आणि वाळूचा किनारा असल्याने तेथे पर्यटकांची अतिशय गर्दी पहावयास मिळते. पर्यटक सुट्ट्या मधे पुळ्याच्या समुद्राला अवश्य भेट देतात.

## रायगड किल्ला

किल्ले रायगड हा महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील सह्याद्रीच्या पर्वतरांगांत असून समुद्रसपाटीपासून सुमारे ८२० मीटर (२७०० फूट) उंचीवर आहे. मराठी साम्राज्याच्या इतिहासामध्ये त्याची एक खास ओळख आहे. छत्रपती शिवाजीराजांनी रायगडचे स्थान आणि महत्त्व पाहून १६ व्या शतकात याला आपल्या राज्याची राजधानी बनविली. शिवराज्याभिषेक याच ठिकाणी झाला. इंग्रजांनी गड कब्जात घेतल्यानंतर लुटून त्याची नासधूस केली. सदर किल्ला हा महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व विभागाचे संरक्षित स्मारक आहे.

ह्याचे प्राचीन नाव ‘रायरी’ हे होते. युरोपचे लोक त्यास ‘पूर्वेकडील जिब्राल्टर’ असे म्हणत असत. जिब्राल्टरचे ठाणे जितके अजिंक्य तितकाच रायगड अजिंक्य व दुर्गम. पाचशे वर्षांपूर्वी त्यास गडाचे स्वरूप नव्हते व तो नुसता एक डोंगर होता, तेव्हा त्यास ‘रासिवटा’ व ‘तणस’ अशी दोन नावे होती. त्याचा आकार, उंची व सभोवतालच्या दऱ्या यावरून त्यास ‘नंदादीप’ असेही नाव पडले. निजामशाहीत रायगडाचा उपयोग कैदी ठेवण्यापुरता होई. मोऱ्यांचा प्रमुख यशवंतराव मोरे जावळीहून पळून रायगडावर जाऊन राहिला तर प्रतापराव मोरे विजापुरास पळाला. महाराजांनी ६ एप्रिल १६५६ रोजी रायरीस म्हणजेच रायगडास वेढा घातला व मे महिन्यात रायरी महाराजांच्या ताब्यात आली. तेथे असताना, कल्याणचा सुभेदार मुल्ला अहमद खजिना घेऊन विजापूरकडे निघाल्याची बातमी महाराजांना समजली. त्यांनी तो खजिना लुटून रायगडावर आणला व त्या खजिन्याचा उपयोग गडाच्या बांधकामासाठी केला. रायगडाचा माथा राजधानी बनवण्यास सोयीचा व पुरेसा आहे. शत्रूला अवघड वाटणाऱ्या प्रदेशातले ते अधिक अवघड ठिकाण आहे. सागरी दळणवळणासही हे ठिकाण जवळ आहे. म्हणून महाराजांनी राजधानीसाठी या गडाची निवड केली. रायगड किल्ल्याचे पूर्वीचे नाव जम्बुदीप असे होते. याच दुर्गदुर्गेश्वराला १५ विविध नावांनी संबोधिले गेले आहे. :- १.रायगड २.रायरी ३.इस्लामगड ४.नंदादीप ५.जंबुद्वीप ६.तणस ७.राशिवटा ८.बदेनूर ९.रायगिरी १०.राजगिरी ११.भिवगड १२.रेड्डी १३.शिवलंका १४.राहीर आणि १५.पूर्वेकडील जिब्राल्टर.

'देवगिरीच्याहुन दशगुणी, दीड गाव उंच, प्रशस्त जागा. पर्जन्यकाळी कड्यावर गवत उगवत नाहि. उभ्या कड्यावर पाखरू उतरावयास जागा नाहि' हे बघून महाराज खुशीने म्हणाले... 'तख्तास जागा हाच गड करावा'. छत्रपती शिवाजी महाराजांच्या या शब्दाचा उल्लेख बखरीत आहे. रायगडाचे स्थान लक्षात घेऊन या किल्यावरच राजधानी बसवण्याचे महाराजांनी निश्चित केले. रायगडाचे जुने नाव रायरी, गडाचा विस्तार प्रचंड असून समुद्रसपाटीपासून किल्याची उंची २९०० फूट आहे. गडाला सुमारे १४३५ पायऱ्या आहेत. गडाच्या पश्चिमेकडे हिरकणीचा बुरूज, उत्तरेकडच टकमक टोक, श्री शिरकाई मंदिर आणि मध्यभागी असलेला महाराजांचा पुतळा हे मुख्य आकर्षण आहे.

शिर्के पाचव्या शतकापासून रायगडाचे स्वामी होते. याची आठवण देणारी गडस्वमिनी श्री शिरकाई मंदिर गडावर आहे. लोकमान्य टिळकांच्या काळात मावळंकर नावाच्या इंजिनिअरने हे मंदिर बांधले आहे. ते श्री शिरकाईचे मूळ मंदिर नाही. मूर्ती मात्र प्राचीन आहे. मूळ शिरकाई मंदिर राजवाड्यास लागून डावीकडे होळी माळावर होते. तेथे मूळ देवळाचा चबुतरा अजूनही आहे. ब्रिटिश काळापासून तेथे श्री शिरकाईचा घरटा हा नामफलक होता.